## अधिसुचना (कलम 14)

क्रमांक 2016/भूसंपादन/अर्धापुर/सिआर-07
उपविभागीय अधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक:- 16/02/2018

## भूमी संपादन,पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013

क्र.2016/भूसंपादन/अर्धापुर/सिआर-07 ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसुचना, क्रमांक 35 दिनांक 5-11/01/2017 अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम 11 च्या पोटकलम (1) अन्वये प्रसिध्द केलेली अधिसुचनेची अंतिम प्रसिध्दी दिनांक 11.01.2017 पासून बारा महिन्याच्या आत कलम 19 पोटकलम 1 ची अधिसुचना प्रसिध्द होणे कायदयाने बंधनकारक आहे. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यक्ता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम 14 च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त प्रकरण व्यपगत होऊ नये यासाठी समुचित शासनाला सदर 12 महिन्याचा कालावधी वाढविण्याचा अधिकार आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 14 अन्वये, सुमुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, याव्दारे उक्त अधिनियमान्वये पत्र क्र 2016/आरबी/डेस्क -3/भूसं/सिआर-132 दिनांक .01.2018 अन्वये 12 महिन्याचा कालावधी वाढविण्यात येत आहे.

### अनुसूची- एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

मौ.देगांव बु. ता.अर्धापुर जि.नांदेड

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 92,93,94,89,82,81,84,85,114,115,122, 120,116,117,118,119,121,127,128,129, 130,131,134,135,132,133,197,213,214, 215,219 व 216 संयुक्त मोजणीनुसार अतिरिक्त गट क्र 83,147,136,137,138 | 7.85 |

**अनुसूची- दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नावः- भूसंपादन प्रस्ताव –वर्धा नांदेड नवीन ब्रॉडगेज रेल्वे व्हाया यवतमाळ पुसद मौ देगांव बु. ता. अर्धापूर जि. नांदेड.

**अनुसूची- तीन**

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

मौ.देगांव बु. ता.अर्धापुर जि.नांदेड

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 92,93,94,89,82,81,84,85,114,115,122, 120,116,117,118,119,121,127,128,129, 130,131,134,135,132,133,197,213,214, 215,219 व 216 संयुक्त मोजणीनुसार अतिरिक्त गट क्र 83,147,136,137,138 | 7.85 |

**अनुसूची -चार**

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सार्वजनिक प्रयोजनासाठी

टिपः- उक्त जमिनीचे आराखडयाचे उपविभागीय अधिकारी नांदेड, प्रशासकिय इमारत, चिखलवाडी नांदेड येथील कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- 16/02/2018

ठिकाणः- नांदेड

उपविभागीय अधिकारी

नांदेड